म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा० वा०
दा. क्र. ९८८८

IRBK-0109888

ग्रं० वा०
3280

बा० वा०
दा० मा०

४०८२९
बालवाङ्मय.
3280
१०-८-७६

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना:—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

DEC 1976

30 AUG 1977

नि शिंपला

मति पायगांवकर

प्रकाशन, पुणे २

[क्रु मा.प.]

IRBK-0109888

मूल्य दोन रुपये

## — अनुक्रमणिका —


१. मामाच्या घरी
२. बिचारा किशू
३. पतंग, चेंडू नि शिंपला
४. पतंग निघाला शोधायला
५. चेंडू निघाला शोधायला
६. शिंपला निघाला शोधायला
७. एकाच झाडाशी
८. भोवऱ्याशी ओळख
९. किशूची भेट



प्रकाशक :
व्हीनस प्रकाशन
'तपश्चर्या'
३८१ क, शनिवार पेठ : पुणे २


चित्रकार :
ग. आ. गांगल

मुद्रक :
य. गो. जोशी
आनंद मुद्रणालय,
१५२३ सदाशिव, पुणे २


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम............
विभाग..............
क्रमांक.............
नों. दि.........
वाचनालय शाखा.




सौ. सुमति पायगांवकर




# मामाच्या गांवी






एक होता मुलगा — अगदी छोटासा.
काळ्या काळ्या डोळ्यांचा
नि गोड गोड गालांचा.
त्याचे नाव होते किशू.
एकदा किशू शेजारच्या गावी गेला.
त्याच्या मामाचे लग्न होते तिथे.
किशूला खेळायला फार आवडे.
आणि मामाला किशू फार आवडे.
मामाने त्याला एक पतंग घेऊन दिला.
एक चेंडू घेऊन दिला.
कोनाड्यात एक शिंपला पडला होता.
तो पण देऊन टाकला !




पतंग, चेंडू नि शिंपला !
किशूला ते फार आवडायचे.
रात्री किशू त्यांना उशाशी ठेवी,
नि म्हणे,
" गाई करा हं आता, झोपून जा बघू. "
पतंग, चेंडू नि शिंपला
गुडुप झोपून जायचे.
लग्न संपले.
किशू आपल्या गावाला निघाला.





पतंग, चेंडू नि शिंपला
बरोबर नेणार होता तो.
पण ताईने पेटी आधीच भरून टाकली
किशूला ते ठाऊकच नव्हते.
तयारी झाली, टांगा आला.
ताईने किशूला हाक मारली.
पतंग, चेंडू नि शिंपला घेऊन
किशू धावत आला.
धापा टाकीत ताईला म्हणाला,
" हे सगळं राहिलं ना,
धर ना हातात. "

ताई म्हणाली,
" आधी का नाही सांगितलंस ?
पतंग जाईल फाटून, चेंडू जाईल पडून,
नि शिंपला जाईल हरवून. टाक सगळं इथंच.
अन् पतंग का कोणी गावाला नेतात ?
वेडाच आहेस. चल, बस टांग्यात. "
चिमुकल्या किशूला रडू रडू आले.
आवडता पतंग, लाडका चेंडू,
नि छानदार शिंपला !
सगळे दूर तिथेच राहिले.
टांगा टपा टपा पुढे गेला !







## ३. बिचारा किशू.

किशू आपल्या घरी आला,
त्याला खूप खूप आठवण येई—
त्याच्या पतंगाने किती तरी पतंग काटले होते·
चेंडू तर एका डावात दोनशे टप्पे करी,
शिंपलाही कानात छान छान गोष्टी सांगायचा—
जलराणीच्या नि रंगीबेरंगी माशांच्या.

झिरमिळ्यावाला लाल - निळा पतंग,
चट्टेरी, पट्टेरी रंगीत चेंडू,
गुलाबी, निळे रंग दिसणारा चमकदार शिंपला !
किशूला वाटे – धावत मामाकडे जावे,
नि सगळ्यांना घेऊन यावे.
ताई म्हणायची, ‘‘ असा काय रडत बसतोस ?
दुसरा पतंग नि दुसरा चेंडू आण ना.
आपल्या घराशेजारीच तर नदी.
शिंपले पण हवे तेवढे मिळतील ! ’’
पण आधीचा पतंग, चेंडू नि शिंपला– किती छान होते !
ताईला काय माहीत ते ? बिचारा किशू !








## ३. पतंग, चेंडू नि शिंपला.

इकडे मामाच्या गावी पतंग विचार करी,
चेंडू विचार करी,
शिंपला पण विचार करी—
किशू कसा भेटेल ?
आपल्याला घेऊन किती धावला किशू !
पण ताईने नेलेच नाही.
ताइटली, खापिटली,
वाईट आहे अगदी !

पतंग चेंडूला म्हणाला,
" इथं कशाला थांबायच ?
चला जाऊ किशूला शोधायला.
शोधत शोधत जाऊ त्याच्या गावी. "
चेंडू म्हणाला,
" खरंच, तिथं तुला तो उंच उडवील.
काटाकुटी करील ! केवढी गंमत ! "
पतंग म्हणाला,
" तुला एका डावात दोनशे टप्पे देईल.
तुझे रंग किती छान दिसतील तेव्हा ? "




चेंडू म्हणाला,
" आणि या शिंपल्याला म्हणेल,
शिंपल्या, शिंपल्या,
जलराणीच्या गोष्टी सांग ना ! "
शिंपला म्हणाला,
" मग लौकर लौकर चला ना !
अगदी लौकर शोधू किशूला. "
लाल, निळा पतंग, रंगीत चेंडू,
नि सुंदर शिंपला !
तिघेही निघाले किशूला शोधायला.
पतंग आकाशात उंच उडाला.
चेंडू जमिनीवरून धावत सुटला.
त्याने शिंपल्यालाही ओढत नेले.
जवळच नदी होती, शिंपला म्हणाला,
" चेंडूभाई, या नदीतूनच जातो मी.
जातो भराभर वहात वहात !




## ४. पतंग निघाला शोधायला.


पतंग आकाशात वाऱ्याला म्हणाला,
" उंच उंच उडव मला, अगदी उंच ! "
पतंग उंच उंच उडू लागला.
घटकेत इकडे, घटकेत तिकडे,
जरा खाली, जरा वर—
बारीक ठिपकाच जसा !
एक ढग हळूच म्हणाला,
" पतंगभाऊ, जोरजोरात चाललास तरी कुठं ?
फाटशील ना, चलना, थंड गारा खायला "
पतंग म्हणाला, " फाटेन तर फाटू दे,
नि नको मला गारा.
माझ्या किशूला शोधतोय मी.
ढग म्हणाला,
" कोण किशू ? कुठलं त्याचं गाव ? "
पतंग म्हणाला,
" त्याचं गाव नाही ना माहीत.
खरंच ! किती लाड करायचा तो आमचे ! "
ढग म्हणाला,
" पण आता तो तुला विसरला असेल.
एक पतंग गेला तर दुसरा. "
पतंग म्हणाला,
" छे, किशू तसा नाहीच मुळी.
मी फार आवडतो त्याला;
चल, जाऊंदे मला. "
पतंग झटकन जरा खाली आला.
जरा दमला पण होता तो.







तिथे भेटले फुलपाखरू.
पतंगाच्या गळयात हात घालून फुलपाखरू म्हणाले,
" पतंगभाऊ, एवढा हेलकावे खात चाललास कुठं?
फाटशील ना. चल ना गोड गोड मध खायला. "
पतंग म्हणाला, " फाटेन तर फाटू दे; नि नको मला मध.
माझ्या किशूला शोधतोय मी. "
फुलपाखरू म्हणाले, " कोण किशू? कुठले त्याचे गाव? "
पतंग म्हणाला, " त्याचं गाव नाही ना माहीत!
खरंच, किती लाड करायचा तो आमचे! "
फुलपांखरू म्हणाले, " अरे तुला तो विसरलाही असेल.
एक पतंग गेला तर दुसरा. "
पतंग म्हणाला, " छे, छे! किशू तसा नाहीच मुळी.
मी फार आवडतो त्याला. चल जाऊदे मला. "



फुलपाखरू निघून गेले.
बिचारा पतंग!
रात्री तो झाडाच्या शेंड्यावर थांबे.
दिवसा त्याच्या किशूला शोधायला निघे.

## ५. चेंडू निघाला शोधायला.

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

चेंडू पण असाच धावत होता.
उंचवटयावरून मैदानात,
मैदानातून चिखलमातीत.
चिखलमातीतून हिरव्या गवतात.
गवतातून काटयाकुटयात,
काटयाकुटयातून शेतात.
पण किशू कुठेच सापडला नाही !
एका शेतात मक्याची कणसे होती.
एक छोटे कणीस म्हणाले, “ का धावतोस ?
मागं लागलंय का तुझ्या कोणी ?
ये ना जरा खेळायला, गप्पा मारायला. ”
चेंडू म्हणाला, “ छे छे, खेळू कसा ?
माझ्या किशूला शोधतोय मी.
त्याचं गाव आहे का ठाऊक ? ”
कणीस म्हणाले, “ कोण किशू ?
कुठलं त्याचं गाव ? ”
चेंडू म्हणाला,
“ माझा किशू नाही का माहीत ?
खरंच, किती लाड करायचा तो माझे ! ”
कणीस म्हणाले,
“ पण तो तुला विसरलाही असेल.
एक चेंडू नाही तर दुसरा. ”
चेंडू रागावून म्हणाला,
“ काही तरीच काय बोलतोस ?
मी किती आवडतो त्याला !
ठाऊक तरी आहे ? ”




चेंडू रागारागात पुढे निघून गेला.
बऱ्याच वेळाने भेटली शेवंतीची फुले.
*मोठाल्या मळ्यात—*
पांढरी शेवंती होती, पिवळी शेवंती होती.
फुले म्हणाली, " थांब थांब, बरा आलास.
फुलराणीला चेंडू हवाय खेळायला.
तिचा जुना चेंडू हरवला आहे.
चल, चल फुलराणीकडे, बोलावलंय तिनं. "

चेंडू म्हणाला, " छे छे ! मी नाही येत.
माझ्या किशूला शोधतोय मी.
त्याचं गाव आहे का ठाऊक ? "
फुलें म्हणालीं,
" हा कुठला भिकारडा किशू ?
एवढं फुलराणीनं बोलावलं तरी येत नाहीस.
आम्हांला नाही माहीत तुझा किशू-बिशू ?
सगळे त्याला असेच म्हणायचे.
त्याला रडू रडू यायचें !




चेंडू खूप रागावून म्हणाला,
" किशू बिशू म्हणू नका हं, सांगून ठेवतो.
कट्टी तुमच्याशी ! हा चाललो मी,
मी किती आवडतो किशूला,
ठाऊक तरी आहे ! "



चेंडू इतका रागावला की,
रागारागात धावतच सुटला.
बिचारा चेंडू दमून गेला.
रात्रभर तो एखाद्या झाडाखाली थांबे.
दिवस उजाडला की किशूला शोधायला धावे.


## ६. शिंपला निघाला शोधायला.

आणि शिंपला कुठें होता इतका वेळ ?
नदीच्या पाण्याबरोबर वहात होता तो.
वहाताना भेटला चिमुकला मासा—
लाल नि सोनेरी !
चिमुकले तोंड उघडून त्याने विचारले,
" शिंपलूभैय्या, कुठं चाललांत घाईघाईत ?
चल ना जलराणीकडे. तिचा वाढदिवस आहे आज !
कमळांच्या बियांचा हलवा,
उकडलेले शिंगाडे. नि गोड गोड खजूर
असा मेजवानीचा थाट आहे. "
शिंपला म्हणाला, " वेळ नाही रे सोन्या !
जलराणीला सांग तसं,
माझ्या किशूला शोधतोय मी,
त्याचं गाव आहे का ठाऊक ? "
चिमुकला मासा म्हणाला,
" ऊँ हूँ ! मुळीच नाही माहीत !
बाबा म्हणतात की फिरायला लांब जायचं नाही. !



मग कसं माहीत होणार ते ?
पण हा कोण किशू ?
अन् त्याला शिंपला नाही तर शंख मिळेल.
चल तू आपला....''
शिंपला रागावून म्हणाला,
''असं काही म्हणू नकोस हं, सांगून ठेवतो.
मी रोज त्याला
जलराणीच्या गोष्टी सांगायचा.
किती मन लावून ऐकायचा तो !
मी किती आवडतो किशूला
ठाऊक तरी आहे !''
शिंपला जोरात वहात दूर दूर गेला.
तिथं नदीतल्या दगडावर
एक गोगलगाय भेटली.
ती म्हणाली, '' शिंपलूभैय्या, अरे थांब ना.
कुठं चाललास घाईघाईत ? तोंड का असं ?
वाईट का वाटतंय कसलं ? ''
शिंपला म्हणाला, '' कसं सांगू ताई ?
माझ्या किशूला शोधतोय ग !
सारखा शोधतोय मी.
त्याचं गाव आहे का ठाऊक ? ''
गोगलगाय म्हणाली, ''नाही रे शिंपलूभैय्या.
खरंच नाही माहीत.
तुझा किशू नि त्याचं गाव माहीत नाही !
पण तो शोधत असेल का रे तुला ?
त्याला असेल का रे तुझी आठवण ?''





शिंपला म्हणाला, " असेल म्हणजे ?
त्याला मी फार फार आवडतो.
जळराणीचा झगमग खवल्यांचा महाल,
त्यातले शेवाळाचे मऊ मऊ गालीचे,
तिचा मोत्या - पोवळ्यांचा पलंग,
नि धावाधाव करणारे छोटेमोठे मासे.
जांभळे नि गुलाबी, रुपेरी नि सोनेरी—
यांच्या गोष्टी किती आवडायच्या त्याला !
या साऱ्या गोष्टी सांगायचा मी त्याला !
माझ्यावर खूप माया करायचा किशू. "


गोगलगाय म्हणाली,
" इतका का चांगला आहे तुझा किशू ?
घाबरू नकोस शिंपलूभैय्या,
सापडेल हं तुझा किशू.
जरा आणखी शोध,
म्हणजे जरूर सापडेल तो. "
बिचारा शिंपला खूप दमला होता.
पण गोगलगाईचे बोलणेच गोड.
त्याला एकदम जोर आला.
तो भराभर पुढे वाहू लागला.






## ७. एकाच झाडाशी.

पतंग उडता उडता थकला होता.
त्याला पकडायला मुले धावायची—
त्यांच्या हातून निसटताना,
थोडा फाटलाही होता तो.
संध्याकाळ झाली,
तशी पतंग उडायचा थांबला.
नदीकाठच्या एका उंच
झाडाच्या शेंड्यावर टेकला.
चेंडूदेखील धावून धावून थकला होता.
त्याला पकडायला मुले धावायची.
त्यांच्या हातून निसटताना
चिखल-मातीत मळला होता तो.
संध्याकाळ झाली, तो एका झाडाशी आला.
पतंग असलेल्या झाडाखाली नेमका थांबला.
झाडाचे एक मूळ लांब नदीत गेले होते —
वाहता वाहता शिंपला त्या मुळाशी आला.
चिमुकला शिंपला खूप दमला होता.
खरचटला होता. शेवाळाने माखला होता.
शिंपलाही मुळाशी नेमका
त्याच झाडाखाली थांबला.




अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
वाचनालय

## ८. भोवऱ्याशी ओळख.

पतंग, चेंडू नि शिंपला,
नेमके एका झाडाशी आले.
रात्रभर तिथेच थांबणार होते ते.
शिंपल्याने सहज पलीकडे डोकावले.
पलीकडे एक भोवरा पडला होता.
लाल, नि हिरव्या पट्ट्यांचा भोवरा म्हणाला,
" का रे थांबलास इथं ? "
शिंपला म्हणाला, " कसं सांगू तुला ?
मी, चेंडूभाई नि पतंगभाऊ
रात्री असेच थांबतो कुठे तरी.
आम्ही किशूला शोधायला निघालोय.
कुठं आहे त्याचं गाव कोणास ठाऊक !
पतंग नि चेंडू तरी कुठं असतील
कोणास ठाऊक ? "
शेंड्यावरच्या पतंगाने बोलणे ऐकले.
बुंध्याशी असलेल्या चेंडूने ते बोलणे ऐकले.
दोघांनी एकदम हाक मारली !
" शिंपलू, कुठं आहेस रे तू ? "
शिंपलू एकदम ओरडला,
" पतंगभाऊ,
चेंडूभाई, हा काय मी इथं आहे ! "





इतक्यात पतंग म्हणाला,
" भोवरेदादा, तू तरी सांग.
आमचा किशू आहे का ठाऊक ? "
भोवरा म्हणाला,
" किशू ? कसा आहे तुमचा किशू ?
सांग सांग लवकर. "
चेंडू गडगडत भोवऱ्याजवळ गेला
नि म्हणाला,
" अरे, काळया काळया डोळयांचा,
गोड गोड गालांचा,
असा छानदार आहे आमचा किशू.
रोज आम्हांला उशाशी घेऊन झोपायचा.
आमचे लाड करायचा. " चेंडूला हुंदका आला

भोवरा एकदम म्हणाला,
" माझाच किशू तर नाही ना हा ?
मलाही तो असाच झोपवायचा.
पण माझा किशू तर गावाला गेलाय—
त्याच्या मामाच्या लग्नाला !
तुम्हांला कसा भेटला असेल ? "
पतंग वरुन ओरडला,
" मामाच्या लग्नाला ना ? मग तोच तो.
कुठं आहे त्याच गांव ?
कुठं आहे त्याचँ घर ? "
पतंग म्हणाला,
" खरंच ? मग चल ना किशूकडे.
तो मामाकडून कव्हाच परत आलाय.
चुकामूक झाली तुमची.
चला सगळे किशूकडे, चला लवकर. "



भोवरा म्हणाला, " मी किशूकडेच तर राहतो.
किशू लग्नाला गेला तो आलाच नाही.
मी त्यालाच शोधायला निघालोय.
रात्र झाली म्हणून थांबलो झाडाखाली."
चेंडू म्हणाला, " पण आता तर रात्र आहे.
वाटबीट चुकलो मग ? "
तशी भोवरा म्हणाला,
" आपण रात्रभर इथंच थांबू.
खूप दमलो पण आहोत.
सकाळ झाली की ताजे-तवाने होऊ
नि जाऊ धावतच.
किशूचं घर या नदीकाठीच आहे.
शिंपलू पण वहात सरळ पोचेल तिथं."
पतंग, चेंडू, भोवरा नि शिंपला
चौघेही मग तिथेच थांबले.
पण कोणालाही झोप येईना.
गोल गोल चांदोबा नि छानदार चांदणे.
चौघांनी रात्रभर गप्पागोष्टी केल्या.
भोवऱ्याने गोष्टी सांगितल्या,
छोटयाशा किशूच्या.
पतंगाने गोष्टी सांगितल्या
सुसाट वाऱ्याच्या.
चेंडूने गोष्टी सांगितल्या
इवलाल्या कळ्यांच्या.
शिंपल्याने गोष्टी सांगितल्या
रंगदार माशांच्या !
सारी रात्र हसाहस नि गंमतच गंमत.


सकाळ उजाडली.
भोवरा गरगर करीत जोरात निघाला.
मागोमाग चेंडू गडगडत धावला.
पतंग हवेत तरंगत जाऊ लागला.
नि शिंपला जो पाण्यात शिरला—
तो भराभर वहातच चालला !
किशूची ताई नदीवर पाणी भरत होती.
किशू तिथेच एका दगडावर बसला होता.
ताई म्हणाली,
" काय सारखा रडत बसतोस ?
दुसरी खेळणी आण ना हवी तर.
जाऊ दे तो पतंग.
नि कसला तो चेंडू नि कसला शिंपला."
किशूला आणखीनच रडू आले.
इतक्यात ? इतक्यात काय झाल ? !



## ९. किशूची भेट.

पतंग पट्दिशी किशूच्या पायाशी पडला.
तोच लाल–निळा पतंग, पण जरा फाटलेला !
भोवरा नि चेंडू पण गरगरत तिथे आले.
तोच रंगीत चेंडू नि तोच हरवलेला भोवरा !
किशूला एकदम रडू आले.
त्याने चटकन त्यांना उचलले
नि छातीशी घट्ट धरून म्हटले,
" कुठं होता तुम्ही सगळे ?
मला किती रडू येत होत !
नि माझा शिंपला कुठाय ? "
किशूने सहज मागे वळून पाहिले.
तिथे, जरा लांब, शिंपला येऊन थांबला होता.
किशूने धावत जाऊन तो उचलला.
पटकन त्याची पपी घेऊन म्हणाला,
" मला गोष्टी सांगायला
कोणीच नव्हत रे ! "
किशूला जास्तच हुंदका आला.
गालांवरून पाणी ओघळत होते.
त्याने सदऱ्याच्या बाहीने डोळे पुसले.
मग धावत जाऊन ताईला म्हणाला,
" बघ ताई, माझा पतंग, चेंडू नि शिंपला !
आलेच की नाही माझ्याजवळ ? "
पुन्हा त्याने सगळ्यांना घट्ट छातीशी धरले.
त्यांना छातीशी धरून किशू जो पळाला,
तो थेट आपल्या मित्राकडे !

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक ....
नों. दि. ....
वाचनालय



IRBK-0109888